# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नाशिक विभागीय मंडळ,नाशिक – ४२२ ००३.

E-Mail –nsksec@rediffmail.com


**महत्वाचे**

क्र./नाविमं/माध्य.ब–1/2354
नाशिक – 422 003
दिनांक :– 24/12/2020

प्रति,
मुख्याध्यापक,
नाशिक विभागीय मंडळाचे कार्यकक्षेतील
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा,
नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगांव.

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च–2021 च्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत...

संदर्भ :–1. शासन निर्णय क.संकीर्ण–2016/प्र.क./195/16/एस.डी.–6,दि.24/11/ 2017.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन कळविण्यात येते की, शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत सुधारित कार्यपध्दतीबाबत शासनाने संदर्भिय दिनांक 24/11/2017 रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

सन 2019 पासून शास्त्रीय कला, चित्रकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक) क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांनाच माध्यमिक शालान्त परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणाची सवलत देण्यात येणार आहे. एखादा विद्यार्थी किडा, शास्त्रीय कला (गायन, वादन, नृत्य) चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एका पेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी कोणत्याही एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे गुण जे उच्चतम आहेत तेच घेण्यासाठी विद्यार्थी अर्ज करून शकतो.

उपरोक्त शासन निर्णय विभागीय मंडळाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करून त्यामध्ये सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच निकाल विहीत कालावधीत लावणे मंडळास शक्य व्हावे, यासाठी विद्यार्थ्यांनी व शाळांनी खालील वेळापत्रकानुसार प्रस्ताव शाळा/मंडळाकडे सादर करावे.

| करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी शाळांकडे प्रस्ताव सादर करणे | 31 डिसेंबर, 2020 |
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | 15 जानेवारी, 2021 |

सोबत परिशिष्ट अ व ब

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक – 422 003.